आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२८ मार्च २०२५ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या ३ एप्रिलपासून थायलंडच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर जाणार
- एम्स रुग्णालयांमधे रुग्णांची कितीही गर्दी झाली तरी आरोग्यसेवेच्या दर्जाबाबत तडजोड होणार नाही असं केंद्रीय आरोग्य मंत्र्यांचं लोकसभेत आश्वासन
- देशी चण्याच्या आयातीवर १ एप्रिलपासून १० टक्के आयात शुल्क लावायचा सरकारचा निर्णय
- छत्तीसगढच्या बिजापूर जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी पेरलेली शक्तिशाली स्फोटकं निकामी करण्यात सुरक्षा दलांना यश
- जागतिक व्यापार संघटनेत वार्षिक निधी योगदान अमेरिकने थांबवलं

**आणि**

- मियामी खुल्या टेनिस स्पर्धेत नोवाक जोकोविच उपांत्य फेरीत दाखल

**<><><><><>**

एम्स रुग्णालयांमधे रुग्णांची कितीही गर्दी झाली तरी आरोग्यसेवेच्या दर्जाबाबत तडजोड होणार नाही अस केंद्रीय आरोग्य मंत्री जे पी नड्डा यांनी आज लोकसभेत सांगितलं. आयुष्मान भारत योजनेअंतर्गात ६२ कोटीपेक्षा जास्त लाभार्थ्यांना विमा कवच देण्यात आलं आहे असं त्यांनी प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं. यात ६ कोटीपेक्षा जास्त ज्येष्ठ नागरिक असून साडेचार कोटी कुटुंबांचा समावेश आहे.

राज्यसभेत समाजवादी पार्टीचे रामजी लाल सुमन यांनी राणा संगा यांच्याविषयी केलेल्या विधानाबद्दल माफी मागावी अशी मागणी सत्ताधारी पक्ष

सदस्यांनी केली. राष्ट्राच्या आदर्शांचा अपमान कोणीही करु नये आणि अशा थोर व्यक्तींविषयी बोलताना सदस्यांनी संवेदनशीलता बाळगावी असं अध्यक्ष जगदीप धनखड म्हणाले. इतरांच्या भावना  दुखावल्या जातील अशी टिप्पणी कोणीच करु नये असंही ते म्हणाले. अध्यक्षांनी सांगितलेल्याचं सर्वांनी पालन केलं पाहिजे असं संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितलं, आणि सपा खासदाराच्या वक्तव्याचा काँग्रेसने आणि इतर विरोधी पक्षांनी निषेध करावा अशी मागणी त्यांनी केली. देशासाठी लढणाऱ्या प्रत्येकाला आदर दिला पाहिजे, मात्र कायदा हातात घेऊन संबंधित खासदाराच्या घरावर हल्ला करणं योग्य नाही, असं विरोधी पक्ष नेते मल्लिकार्जुन खरगे म्हणाले. या मुद्यावरुन गदारोळ झाल्यानं सभागृहाचं कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

**<><><><><>**

देशी चण्याच्या आयातीवर १ एप्रिलपासून १० टक्के आयात शुल्क लावायचा निर्णय सरकारनं घेतला आहे. अर्थमंत्रालयानं २७ मार्च रोजी याबद्दलची अधिसूचना जारी केली आहे. चण्याची देशातली उपलब्धता वाढवण्यासाठी आणि किंमतींवर नियंत्रण ठेवण्यासाठी गेल्या वर्षी मे महिन्यात सरकारनं चण्याच्या निःशुल्क आयातीला परवानगी दिली होती. याची कालमर्यादा येत्या ३१ मार्च रोजी संपणार आहे. सरकारच्या आकडेवारीनुसार २०२४-२५मध्ये १ कोटी १५ लाख टन देशी चण्याचं उत्पादन झाल्याचा अंदाज आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या ३ एप्रिलपासून थायलंडच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. थायलंडची राजधानी बँकॉक इथे सहाव्या बिमस्टेक शिखर परिषदेत ते सहभागी होती. थायलंडचे प्रधानमंत्री पेतोंगटार्न शिनावात्रा यांनी मोदी यांना या दौऱ्यासाठी निमंत्रित केलं आहे. प्रधानमंत्र्यांचा तिसरा थायलंड दौरा असेल. या दौऱ्यात ते बिमस्टेक नेत्यांशी सहकार्य वाढवण्यासाठी चर्चा करणार

आहेत. या भेटीनंतर मोदी हे श्रीलंकेचे राष्ट्रपती अनुराकुमारा दिसानायके यांच्या निमंत्रणावरून श्रीलंकेच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यात ते दोन्ही देशांमध्ये आधी झालेल्या सहकार्याच्या क्षेत्रांमध्ये झालेल्या प्रगतीचा आढावा घेतील. याखेरीज ते अनेक राजकीय नेत्यांसोबत बैठकांनाही उपस्थित राहतील आणि भारताच्या सहकार्याने राबवलेल्या विकास प्रकल्पांच्या उद्घाटनासाठी अनुराधापुरा इथे उपस्थित राहतील.

**<><><><><>**

हरियाणाजवळ शंभू आणि खनौरी सीमेजवळ आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांना हटवून इथला राष्ट्रीय महामार्ग वाहतुकीसाठी मोकळा केल्याची माहिती पंजाब सरकारनं आज सर्वोच्च न्यायालयाला दिली. तसंच शेतकरी नेते जगजीत सिंह डल्लेवाल यांनी आज उपोषण सोडल्याचंही पंजाबचे ॲडव्होकेट जनरल गुरमिंदर सिंह यांनी न्यायालयाला सांगितलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या ३० तारखेला आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या मालिकेचा हा १२०वा भाग असेल.

**<><><><><>**

छत्तीसगढच्या बिजापूर जिल्ह्यात सुरक्षा दलांनी आज सकाळी नक्षलवाद्यांनी पेरलेलं शक्तिशाली स्फोटकं शोधून ते निकामी केलं. हे स्फोटक ४५ किलो वजनाचं असून एका मिनी ट्रकचा विध्वंस करून जमिनीत १५ फुटांचा खड्डा पडेल इतकं ते शक्तिशाली होतं. केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या २२२व्या बटालियनने आज सकाळी एका कामगिरीवरून परत येताना हे स्फोटक शोधून काढलं.

**<><><><><>**

जागतिक व्यापार संघटनेत  वार्षिक योगदान थांबवण्याचा निर्णय अमेरिकने घेतला आहे. 'अमेरिका प्रथम' या धोरणाचा एक भाग म्हणून अमेरिकेने याआधी जागतिक आरोग्य संघटना आणि इतर कल्याणकारी आंतरराष्ट्रीय संघटनांमधे योगदान देणं थांबवलं आहे. जागतिक व्यापार संघटनेच्या वार्षिक निधीतला सुमारे ११ टक्के वाटा अमेरिकेकडून मिळतो. त्यासाठी संघटनेच्या अर्थसंकल्पीय बैठकीत, योगदानाविषयी अमेरिकेचा निर्णय अद्याप अंतिम झालेला नसल्याचं अमेरिकेच्या प्रतिनिधीने नमूद केलं. आणि हा निर्णय कधी होईल याबद्दलही स्पष्ट माहिती दिली नाही.

**<><><><><>**

अमेरिकेने वाहनांच्या सुट्या भागांच्या आयातीवर २५ टक्के कर लावला असून याचा सर्वाधिक परिणाम चीन, जपान आणि कोरियावर होऊ शकतो, कारण वाहनांच्या सुट्या भागांचा त्यांच्या निर्यातीत ७ टक्के वाटा आहे, असं मॉर्गन स्टेनलेच्या अहवालात म्हटलं आहे. यामुळे जपानची औद्योगिक वाढ काही प्रमाणात मंदावू शकते असंही  अहवालात म्हटलं आहे. अमेरिका याशिवाय ऊर्जा, औषधनिर्मिती, सेमीकंडक्टर्स , कृषी आणि धातूंच्या आयातीवर देखील वाढीव कर लावण्याचा विचार करत आहे.

भारताची स्वतःची देशांतर्गत बाजारपेठ बळकट असल्यामुळे आणि स्थूल राष्ट्रीय उत्पन्नातलं निर्यातीचं  प्रमाण तुलनेने कमी असल्यामुळे भारतावर या जागतिक व्यापार उलथापालथीचा परिणाम कमी होईल असं या अहवालात म्हटलं आहे.

**<><><><><>**

म्यानमारला आज सलग दोन मोठे भूकंपाचे धक्के बसले. या धक्क्यांची तीव्रता ७ पूर्णांक ७ दशांश आणि ६ पूर्णांक ४ दशांश रिख्टर स्केल होती. या भूकंपाचं केंद्र सागाइंग इथं होतं. या धक्क्यांमुळं अनेक इमारती कोसळल्या.

थायलंडची राजधानी बँकॉकमध्येही भूकंपाचे धक्के जाणवल्यानं अनेक नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आलं आहे. इथं कोणतीही जीवित किंवा वित्तहानी झाल्याचं वृत्त अद्याप हाती आलेलं नाही.दरम्यान छत्तीसगढच्याच नारायणपूर जिल्ह्यात आज नक्षलवाद्यांनी पेरलेल्या स्फोटकांचा स्फोट होऊन बस्तर फायटर्स या सुरक्षा दलाचा एक जवान जखमी झाला आहे. त्याला उपचारांसाठी जिल्हा रुग्णालयात दाखल केलं आहे.

**<><><><><>**

मियामी खुल्या टेनिस स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत आज सर्बियाच्या नोवाक जोकोविचने अमेरिकेच्या सेबास्टियन कोर्डा याला ६-३, ७-६ अशा सरळ सेटमध्ये पराभूत केलं. या स्पर्धेच्या उपांत्य फेरीत पोहोचणारा जोकोविच हा सर्वात वयस्कर खेळाडू ठरला आहे. त्याने रॉजर फेडरर याचा २०१९मधे मियामी स्पर्धेच्या अंतिम चार खेळाडूंमधे स्थान मिळवणारा सर्वात वयस्कर खेळाडू हा विक्रम मोडीत काढला आहे. या स्पर्धेच्या उपांत्य फेरीत जोकोविचची गाठ बल्गेरियाच्या ग्रिगोर दिमित्रोव्ह बरोबर पडेल. भारतीय वेळेनुसार आज रात्री बारा वाजता फ्लोरिडा इथे हा सामना होणार आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर केलेल्या विडंबन गीतामुळे वादग्रस्त ठरलेले कॉमेडियन कुणाल कामरा यांनं आज मद्रास उच्च न्यायालयात या प्रकरणी अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला. या प्रकरणी मुंबई पोलिसांनी दोन वेळा समन्स बजावलं आहे.

**<><><><><>**

भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा भारतीय नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे. त्याचं रक्षण करणं महत्त्वाचं असल्याचं म्हणत सर्वोच्च न्यायालयाने काँग्रेस खासदार इम्रान प्रतापगढी यांच्याविरुद्ध गुजरात पोलिसांनी दाखल केलेली तक्रार

रद्द करण्याचे आदेश दिले आहेत. एका कथित प्रक्षोभक गाण्याचा संपादित व्हिडीओ पोस्ट केल्याचा आरोप प्रतापगढी यांच्यावर होता. व्यक्ती किंवा समुदायांच्या विचारांची मुक्त अभिव्यक्ती ही निरोगी आणि सुसंस्कृत समाजाचा अविभाज्य भाग असल्याचंही सर्वोच्च न्यायालयाने यावेळी अधोरेखित केलं. प्रतापगढी यांच्यावर जामनगर इथे ३ जानेवारी रोजी झालेल्या सामूहिक विवाह समारंभात कथित प्रक्षोभक गाणं गायल्याचा आणि त्याचा व्हिडीओ पोस्ट केल्याचा आरोप होता.

**//<><><><><>//**